मा.जिल्हाधिकारी यांचेकडून अकृषिक आदेश प्राप्त करणेसाठी नाहरकत दाखला

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता.जि.ठाणे- ४०१ १०१

जा.क्र.मिभा/मनपा/नर/ 2233/2008-09 दिनांक- 20/10/2008

प्रति,
जमीन/जागामालक - श्री. अनिल मोतीराम भोईर व ईतर, श्री. मधुकर बिस्तूर भोईर व ईतर
श्री. आत्माराम लक्ष्मण पाटील व ईतर, श्रीमती जयाबाई यशवंत भोईर
श्रीमती कुसुम दिपक पाटील
अधिकार पत्रधारक - मे. जी.एन. कन्स्ट्रक्शन
द्वारा- वास्तुविशारद - मेसर्स नकाशा आर्किटेक्ट

विषय- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे — मिरा
स.क्र./हि.क्र. नविन ५०/९,१०, ४९/३,४,५,६,८ जुना १८१/९,१०, १८२/३,४,५,६,८
या जागेत नियोजित बांधकाम करण्यासाठी जागेस अकृषिक आदेश
प्राप्त करणेसाठी मा. जिल्हाधिकारी यांना सादर करणेसाठी
नाहरकत दाखला मिळणे बाबत.

संदर्भ- १. आपला दि.२४/०७/२००८ चा अर्ज.
२. मे.सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील आदेश क्र.
यु.एल.सी./टी.ए/एटीपी/डब्ल्यु.एस.एच.एस.-२०/एसआर-१७३५, दि.२४/०१/२००७,
एसआर-५६४, दि.१४/०७/९४, एसआर-५७९, दि.२४/०५/९४, एसआर-१८६१,
दि.१५/११/२००७, एसआर-१७३३, दि.२४/०१/२००७ व यु.एल.सी./टिए/
मिरा/एसआर-१६, दि.१७/०८/८८ ची मंजुरी.

महोदय,

विषयांकित प्रकरणी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रांतील मौजे — मिरा सर्वे.क्र./हिस्सा.क्र. नविन ५०/९,१०, ४९/३,४,५,६,८ जुना १८१/९,१०, १८२/३,४,५,६,८ मधील जागेस अकृषिक परवानगी प्राप्त करणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावयाच्या नकाशास खालील अटींस अधिन राहुन मंजुरी देण्यात येत आहे.

१) विषयांकित जागेस मा.जिल्हाधिकारी यांच्याकडून अकृषिक परवानगी प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ नुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३, २५४ (प्रकरण १२ सह) विहीत नमुन्यात बांधकाम प्रारंभपत्रासाठी अर्ज करण्याची व बांधकाम प्रारंभपत्र प्राप्त करण्याची जबाबदारी आपणांवर राहील. सदर नाहरकत दाखल्याची मुदत एक वर्षासाठी आहे. सदर नाहरकत दाखल्याच्या आधारे जागेवर कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करता येणार नाही, अन्यथा बांधकाम केल्यास सदरचे बांधकाम अनाधिकृत ठरवुन विहीत कार्यवाही करण्यात येईल. तसेच बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी विद्युतपुरवठा करणेबाबत महानगरपालिकेचे नाहरकत प्रमाणपत्र घेणे आपणावर बंधनकारक राहिल.

२) बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, ठाणे यांचेकडील मोजणी नकाशा सादर करणे आपणावर बंधनकारक राहिल.

३) सदर जागेच्या मालकीबाबत व न्यायालयात दावा प्रलंबीत नसल्याबाबत आपण प्रतिज्ञापत्र दि.२५/०६/२००७ रोजी दिलेले आहे. याबाबत काहीही विसंगती आढळून आल्यास दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल.

४) बांधकाम प्रारंभपत्रापूर्वी यु.एल.सी. विभागाकडील कलम २० च्या आदेशासाठीची मुदतवाढ सादर आपणावर बंधनकारक राहिल.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका